**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र. : 0253-2461439** **ईमेल : dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव: नियोजन शाखा** **संकलन: कुंभमेळा**

---

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- सन 2027-28 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 26 फेब्रुवारी 2025 रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, (नवि-25) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.बैठक-2025/प्र.क्र.07/नवि-25 दि.27.03.2025.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 26, फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 01.00 वाजता सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीचे इतिवृत्त उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त पुढील कार्यवाहीस्तव या सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,
Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 28-03-2025 21:22:51
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक.

टिप : आपल्या कार्यालयात ई- ऑफिस असल्यास Pournima Anil Burkul यावर, नसल्यास crunsk-divcom@mah.gov.in या मेलवर पत्रव्यवहार करावा ही विनंती .

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
४ था मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२
Email ID : **ud२५.urban-mh@mah.gov.in**


---

क्र. बैठक-२०२५/प्र.क्र. ०७ /नवि-२५ | दिनांक : २७ मार्च, २०२५

**प्रति,**

१) मा.उप मुख्यमंत्री महोदय (नगर विकास व सार्वजनिक बांधकाम विभाग)
२) मा.उप मुख्यमंत्री महोदय (वित्त व नियोजन)
३) मा.मंत्री महोदय (जलसंपदा,विदर्भ,तापी खोरे व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ
४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
५) अपर मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
६) अपर मुख्य सचिव,महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव,वन विभाग,मंत्रालय,मुंबई
८) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव,विमानचलन,मंत्रालय,मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग(नवि-१), मंत्रालय, मुंबई
१७) अपर मुख्य सचिव, (सांस्कृतिक कार्य),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१८) प्रधान सचिव नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, मुंबई
१९) प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२०) प्रधान सचिव ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई.
२१) प्रधान सचिव,माहिती व जनसंपर्क,मंत्रालय,मुंबई.
२२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) प्रधान सचिव,पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) प्रधान सचिव,माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
२५) पालक सचिव,नाशिक तथा प्रधान सचिव ,ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई
२६) सचिव,उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सचिव, आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२८) विभागीय आयुक्त, नाशिक

२९) जिल्हाधिकारी, नाशिक

३०) विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र

३१) आयुक्त,नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,नाशिक

३२) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई

३३) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

३४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक

३५) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ(MSRTC)

३६) पोलीस आयुक्त,नाशिक

३७) पोलीस अधिक्षक,नाशिक ग्रामीण.

३८) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ(MSRDC)

३९) मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर

**विषय :- सन २०२७-२८ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६.०२.२०२५ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २६.०२.२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मंत्रीमंडळ कक्ष, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**आपला,**

27/03/2025

सोबत : वरीलप्रमाणे.

**(मो.क. बागवान)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत : माहितीस्तव अग्रेषित -**

१) मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रशासकीय अधिकारी.

२) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

३) उप सचिव (नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

**दिनांक २६/०२/२०२५ रोजी दुपारी १.०० वा. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

सदर बैठकीला उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

दिनांक २६/०२/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.मंत्री जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन यांच्या उपस्थितीत सहयाद्री अतिथी गृह, मुंबई येथे नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या पुर्वतयारी बाबत बैठक झाली. त्यावेळी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १७/०१/२०२५ च्या बैठकीत दिलेल्या निर्देशांबाबत अनुपालन अहवाल सादर केला. त्याचप्रमाणे प्रयागराज येथे अधिकाऱ्यांच्या चमुने दिलेल्या भेटीबाबत व तेथे निदर्शनास आलेल्या प्रमुख बाबीं बाबत माहिती दिली व त्या अनुषंगाने नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात करावयाच्या सुधारित नियोजनाबाबत सविस्तर सादरीकरण केले. बैठकीदरम्यान मा. अध्यक्ष यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिले.

| अ.क्र | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| १. | प्रयागराज या ठिकाणी आलेल्या भाविकांची संख्या आणि सध्या धार्मिक पर्यटनाकडे वाढलेला लोकांचा कल पाहता नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी नियोजन करताना अधिकाधिक गर्दी होईल हे ध्यानात ठेवून सर्व प्रकारचे नियोजन करावे. यासाठी प्रयागराज येथील तयार केलेल्या आराखड्याचा सूक्ष्म अभ्यास करून त्याप्रमाणे कामे निश्चित करून करावीत. त्याचप्रमाणे नाशिक- त्र्यंबकेश्वर येथील २०१५ च्या कुंभमेळ्या मधील नियोजन याचाही अभ्यास करावा व त्यातील विश्लेषणानुसार नियोजन करावे. | विभागीय आयुक्त,नाशिक |
| २. | नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी चोख नियोजन आणि अंमलबजावणीसाठी प्रयागराजच्या धर्तीवर कुंभमेळा प्राधिकरण तयार करावे, त्यासाठी विशेष कायदा करावा. सदर कायद्याचा मसुदा विभागीय आयुक्त यांनी यथाशीघ्र सादर करावा व त्यावर पुढील उचित कार्यवाही शासन स्तरावर करावी. या कायद्यामध्ये प्रयागराज कुंभमेळा प्राधिकरणा प्रमाणे नाशिक- त्र्यंबकेश्वरला सुसंगत अशा प्रकारच्या तरतुदी ठेवाव्यात. त्यात प्रयागराजच्या धर्तीवर आवश्यक ते मनुष्यबळ अखत्यारीत घेणे आणि सर्व कार्यान्वयीन यंत्रणांवर उचित पर्यवेक्षण आणि नियंत्रण राहण्यासाठी आवश्यक ते प्रशासकीय आणि अधिकारांबाबत तरतूदी ठेवाव्यात. | १. प्रधान सचिव, नगर विकास विभाग(नवि-२)<br><br>२.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग<br><br>२.विभागीय आयुक्त, नाशिक |
| ३ | २०२७ चा कुंभमेळा "डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ" म्हणून ओळखला जावा यासाठी नियोजन करावे. याकरिता संपूर्ण कुंभमेळ्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. विशेषत: गर्दीचे आणि वाहतुकीचे नियोजन यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरावे. | १.प्रधान सचिव,माहिती व तंत्रज्ञान<br><br>२.विभागीय आयुक्त,नाशिक |

| | | |
|---|---|---|
| ४ | कुंभमेळ्यासाठी भाविकांना उत्कृष्ट प्रकारची अनुभूती मिळेल अशा पद्धतीच्या प्रदर्शनी जसे की, digital, audio-visual, interactive, AR/VR अशा प्रकारच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून केलेल्या प्रदर्शनी यांचे नियोजन करावे. | १.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान<br>२. प्रधान सचिव,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |
| ५ | नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन विभागाच्या उर्वरित भरती प्रस्तावाच्या अनुषंगाने ३५ टक्के खर्च मर्यादा शिथिल करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. | १.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपालिका. |
| ६ | नाशिक महानगरपालिकेची भरती प्रक्रिया होण्यासाठी बिंदू नामावली अंतिम करावी. | १.अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग.<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ७ | नाशिक येथील साधुग्राम भूसंपादनासाठी पर्याय शासनास सादर केलेले आहे त्यास मान्यता द्यावी. | १.अपर मुख्य सचिव, नगर विकास (नवि-१) |
| ८ | सध्याचे प्रस्तावित साधुग्रामसाठी असलेली आरक्षित जागा पुरेशी वाटत नसल्यामुळे आणि मोठ्या प्रमाणावर भाविक अपेक्षित असल्यामुळे आणखी अतिरिक्त जागांवर अशा प्रकारच्या तात्पुरत्या वसाहती (टेंट सिटी, धार्मिक नगरी, भाविक नगरी, साधुग्राम, इत्यादी) तयार करण्यासाठी जागांची निश्चिती करून त्या उभाराव्यात. | १. प्रधान सचिव,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग<br>२.विभागीय आयुक्त,नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४. आयुक्त,NMRDA नाशिक<br>५.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| ९ | त्याचप्रमाणे गोदावरी नदीवरील घाटांची संख्या देखील वाढवावी. | विभागीय आयुक्त,नाशिक |
| १० | सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जलसंपदा विभागामार्फत आवश्यक ते पाण्याचे आरक्षण ठेवण्याची प्रक्रिया करावी. त्र्यंबकेश्वर येथील गोदावरी नदीत पाणी राहील याकरिता तेथील स्टोरेज टँक/ साठवण तलाव आणखी मोठा करता येईल किंवा | अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | इतर कोणत्या उपाययोजना करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा जेणेकरुन प्रत्यक्ष कुंभमेळा चालू असताना गोदावरी नदीत पाण्याचा वाहता प्रवाह ठेवणे शक्य होईल.याअनुषंगाने उचित कार्यवाही करावी. | |
| ११ | त्र्यंबकेश्वर येथील धार्मिक कॉरिडॉरचा प्रस्ताव शासनास सादर करावा व त्याला शासनस्तरावर मान्यता द्यावी. | १.प्रधान सचिव,पर्यटन विभाग<br>२.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-२)<br>३.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| १२ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील मंदिरांचे, विशेषतः त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराचे, उत्कृष्ट प्रकारचे जतन आणि संवर्धनाची कामे हाती घेऊन कुंभमेळ्यापुर्वी पूर्ण करावे. दोन्ही शहरातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे बाजूला करुन जागा मोकळ्या कराव्यात. गरजेनुसार भूसंपादन करावे. | १.प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग (पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय)<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>३.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| १३ | नाशिक- त्र्यंबकेश्वर पासून जवळ असलेले शिर्डी, वणी, शनिशिंगणापूर, मांगीतुंगी अशा सर्व स्थळांचा एकत्रित विकास आराखडा करून त्याचा धार्मिक पर्यटनाचा कॉरिडॉर करावा. | १.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग<br>२.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>३.अपर मुख्य सचिव, (सांस्कृतिक कार्य) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग<br>४.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग<br>५.प्रधान सचिव, (पर्यटन) व सांस्कृतिक कार्य विभाग |
| १४ | नाशिक शहरातील मलजल/ सांडपाणी शुद्धीकरण यंत्रणेसाठी निविदा RFQ प्रसिध्द झाली आहे. शासनाकडून या प्रकल्पासाठी योग्य त्या शीर्षामधून/ योजना मधून निधी उपलब्ध करून द्यावा. त्याचप्रमाणे नाशिक मधील औद्योगिक वसाहती मधील सांडपाणी व्यवस्थापन आणि त्यावरील प्रक्रिया याबाबत आवश्यक ती यंत्रणा उभारावी. | १.प्रधान सचिव,नगर विकास (नवि-२)<br>२.सचिव,उद्योग विभाग |

| | | |
|---|---|---|
| १५ | नाशिक आणि शिर्डी या विमानतळाला जोडणारे रस्ते, त्याप्रमाणे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर महामार्ग, नाशिक शहराभोवतील राज्य महामार्ग 37 चे रुंदीकरण करून करावयाचे बाह्य वळण रस्ता असे महत्त्वाचे रस्ते विभागीय आयुक्त आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निश्चित करून त्यांची कामे त्वरित सुरू करावी. त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील आवश्यक त्या पुलांची कामे त्वरीत सुरू करावी आणि इतर रस्त्यांच्या कामांची निश्चिती करून त्याचीही कामे सुरू करावी. वरील सर्व रस्ते आणि पुलांची कामे ज्या ठिकाणी कुंभमेळयाची वाहतुक होणार आहे अशाच ठिकाणी करावित. | १.अपर मुख्य सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>३.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| १६ | नाशिक शहराला अहमदाबाद शहराच्या धर्तीवर रिंग रोड करता येईल काय याबाबत NMRDA यांनी तपासणी करावी | आयुक्त,NMRDA नाशिक |
| १७ | केंद्र शासनाच्या अखत्यारितीत रस्त्यांचे रुंदीकरण आणि बळकटीकरण करण्यासाठी केद्र शासनास लिहावे आणि शक्य झाल्यास केंद्र शासनाकडून निधी मागवून महाराष्ट्र शासनाच्या यंत्रणांमार्फत त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी अशी विनंती करावी. | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| १८ | कुंभमेळ्या दरम्यान शहराअंतर्गत गर्दीतून आपत्कालीन वाहतूक करण्यासाठी ग्रीन कॉरिडोर ठेवावे. | अपर मुख्य सचिव, गृह विभाग |
| १९ | गोदावरी नदीच्या कडेने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरला जोडणारा रस्ता तयार करण्याचे नियोजन करावे. यासाठी त्वरित ड्रोन व इतर सर्वेक्षण करावे. | आयुक्त , NMRDA नाशिक |
| २० | वाहतुकीचे नियोजन करताना आऊटर पार्किंग ते घाटाच्या जास्तीत जास्त जवळ असणाऱ्या इनर पार्किंग पर्यंत अत्याधिक वारंवारितेने अंतर्गत शटल बसेस चालवाव्यात. | १.अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>२.अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग |
| २१ | मध्य रेल्वेने नाशिक रोड येथील आणि इतरत्र मागणी केलेल्या जागांबाबत विचार करून होल्डिंग एरियासाठी आणि रेल्वे स्टेशनच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या जागांबाबत उचित कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे नाशिक रोड येथे रेल्वे सोबतच एम.एस.आर.टी.सी. बस, शहर बस आणि प्रस्तावित नाशिक मेट्रो आणि पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचे स्थानके या सर्वांची एकत्रित इंटिग्रेटेड स्टेशन डेव्हलपमेंट करण्याचा आराखडा तयार करावा. त्याची अंमलबजावणी अशा पद्धतीने करावी की, कुंभमेळ्यामध्ये भाविकांसाठी पर्याप्त होल्डिंग एरिया उपलब्ध होईल आणि त्याचप्रमाणे त्यानंतर इंटिग्रेटेड स्टेशन डेव्हलपमेंटचे उर्वरित बांधकाम पूर्ण होईल. याकामी गृह (परिवहन) विभागाने नोडल विभाग म्हणून काम करावे. | १.अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>२.अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग |
| २२ | नाशिक जिल्हयातील मनमाड, देवळाली, नांदगाव, इगतपुरी इ. रेल्वे स्टेशनाचा देखील भाविकांच्या वाहतूकीकरीता प्रभावी वापर करावा त्या ठिकाणावून कुंभमेळयाच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था कार्यन्वित करण्यात यावी | अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग |

| | | |
|---|---|---|
| २३ | नाशिक विमानतळाचे विस्तारीकरण करून तिथे विमान पार्किंग क्षमता सध्याच्या तिप्पट करणे, त्याचप्रमाणे टर्मिनल मधील प्रवासी वाहतूक हाताळणी क्षमता वाढवणे याबाबत केंद्र शासनाशी समन्वय साधून उचित कार्यवाही करावी. | १.अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>२.अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग |
| २४ | शिर्डी, छत्रपती संभाजीनगर आणि नवी मुंबई येथील विमानतळाचीही पार्किंग आणि प्रवासी वाहतुक हाताळण्याची क्षमता वाढवावी. | १.अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>२.अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग |
| २५ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे किमान ०५ हेलिपॅड तयार करावेत. | १.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| २६ | कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथे इन्वेस्टमेंट कुंभ, तंत्रज्ञान कुंभ यासारख्या branding activities सातत्याने घ्याव्यात. | विभागीय आयुक्त, नाशिक |
| २७ | कुंभमेळयासाठी लोगो निश्चितीची कार्यवाही स्पर्धा घोषित करून करावी. | अपर मुख्य सचिव, (सांस्कृतिक कार्य) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |
| २८ | जी कामे यथाशीघ्र सुरु करणे आवश्यक आहे त्याबाबत येत्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करावी. तसेच कुंभमेळ्याशी संबंधित कामेच कुंभमेळा निधीतून घ्यावीत. | विभागीय आयुक्त, नाशिक |
| २९ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या ठिकाणी अद्यावत सीसीटीव्ही आणि पब्लिक अॅड्रेस सिस्टम याचे नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी. | १.अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपलिका<br>३.मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| ३० | सर्व टेलिकॉम कंपन्यांशी संपर्क साधून कुंभमेळा काळात मोबाईल कनेक्टीव्हीटी उत्तम राहील याविषयी आवश्यक ती कार्यवाही करावी. | १.प्रधान सचिव,माहिती व तंत्रज्ञान<br>२.विभागीय आयुक्त,नाशिक |
| ३१ | कुंभमेळयाच्या प्रसिद्धी तसेच इतर कामांमध्ये सीएसआर फंडाचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीकोनातून औद्योगिक आस्थापना व इतर कंपन्या,बँका यांच्या कडून आवश्यक ते सहकार्य प्राप्त करुन घेणेबाबत प्रयत्न करावेत. | १.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग<br>२. सचिव,उद्योग<br>३.विभागीय आयुक्त, नाशिक |